

पणजी : गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करताना उपसभापती विष्णू सूर्या वाघ. बाजूस इतर.

# गोवा लायब्ररी असोसिएशनचे विष्णू वाघ यांच्या हस्ते उद्‌घाटन

पणजी, ता. १४ : पुस्तकासारखा दुसरा चांगला मित्र नाही, गुरू नाही, वेळेस मित्र मैत्री तोडू शकतो, गुरू विद्या लपवू शकतो, पण पुस्तक नाही. प्राचीन आधुनिक अशा विचाराचं संचित जाणून घेण्यासाठी पुस्तक हे महत्त्वाचं माध्यम आहे, असे प्रतिपादन उपसभापती विष्णू सूर्या वाघ यांनी केले.

गोवा लायब्ररी असोसिएशन या नवीन संघटनेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. आपण किती वाचतो त्यापेक्षा काय वाचतो आणि कसं वाचतो यावर आपली आकलन शक्ती वाढत जाते, स्मरणशक्ती वाढते. स्वतःबद्दल वाचन लेखन या पार्श्वभूमीचा आढावा घेत वाघ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनासाठी आव्हान केले. आजच्या तांत्रिक युगात वाचनालयांनीसुद्धा बऱ्यापैकी आपली सांगड आधुनिक तंत्रज्ञानाशी घातलेली आहे. फक्त ज्ञानपिपासू विद्यार्थ्यांची गरज आहे, असंही वाघ म्हणाले. यावेळी उपसभापतींच्या हस्ते गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शकीचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी साळगावकर कॉलेजचे प्राचार्य प्रसाद सर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार बाळा मांद्रेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली, सूत्रसंचालन करुणा सातार्डेकर यांनी केले व सचिव मानसी वेर्लेकर यांनी आभार मानले.

गोमन्तक
पणजी, शुक्रवार, १५ जुलै २०१६



गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे उद्‌घाटन केल्यानंतर उपस्थित विष्णू वाघ. सोबत इतर.

# पुस्तकासारखा गुरू नाही : वाघ

**पणजी** : पुस्तकासारखा दुसरा गुरू नाही. चांगला मित्र नाही. वेळेस मित्र मैत्री तोडू शकतो, गुरू विद्या लपवू शकतो पण पुस्तक नाही, असे प्रदिपादन उपसभापती विष्णू सूर्या वाघ यांनी केले.

'गोवा लायब्ररी असोसिएशन' या नवीन संघटनेच्या उद्घाटनप्रसंगी वाघ बोलत होते. आपण किती वाचता आणि कसे वाचतो यावर आपली आकलन शक्ती वाढत जाते, स्मरणशक्ती वाढते, असे पुढे वाघ म्हणाले.

गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे यावेळी विष्णू वाघ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. असोसिएशनच्या संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार बाळा मांद्रेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

करूणा सातार्डेकर यांनी सूत्रसंचाल केले. मानसी वेर्लेकर यांनी आभार मानले.

गोवन वार्ता
शुक्रवार दि. १५ जुलै २०१६